महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ २२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ २२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:एमआयएस-०१२०/सी.आर.१८/२०२० /तेवीस दिनांक:-३० सप्टेंबर, २०२१

## -:प्रसिध्दीपत्रक:-

**विषय:-आयोगामार्फत आयोजित भरतींकरीता निवडप्रक्रियेच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्याबाबत**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून आयोजित विविध भरती प्रक्रियांचे अंतिम निकाल जाहीर करण्याबाबतच्या प्रचलित कार्यपध्दतीचा साकल्याने विचार करुन निवडप्रक्रियेच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्याची बाब आयोगाच्या विचाराधीन होती. यासंदर्भात आयोगाकडून पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे:-

(१) आयोगामार्फत आयोजित सर्व भरतीप्रक्रियांकरीता सर्वसाधारण गुणवत्ता यादी (Merit List) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

(२) बहुसंवर्गीय पदांच्या भरतीप्रक्रियांकरीता आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या सर्वसाधारण गुणवत्ता यादीच्या आधारे पात्र उमेदवारांकडून पसंतीक्रम मागवून त्याच्या आधारे अंतिम शिफारस यादी तयार करण्यात येईल.

(३) बहुसंवर्गीय पदांच्या भरतीप्रक्रिया वगळता अन्य भरतीप्रक्रियांकरीता सर्वसाधारण गुणवत्ता यादीच्या आधारे अंतिम शिफारस यादी तयार करण्यात येईल.

**२.** निवडप्रक्रियेसंदर्भातील उपरोक्त सुधारित कार्यपद्धत सन २०२० व तदनंतर प्रसिध्द करण्यात आलेल्या सर्व जाहिरातींच्या प्रलंबित निकाल प्रक्रियांपासून लागू राहील.

ठिकाण: मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग